भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६

(१९४६ चा अधिनियम क्रमांक ३१)

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Foreigners Act, 1946

## (Act No. 31 of 1946)

**[As in force on the 1st July, 1980]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९८०

[किंमत ५० पैसे]

105

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'विदेशी व्यक्ती (विशोधन) अधिनियम, १९४७' (१९४७ चा ३८).

२. 'भाग ख राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३).

३. 'विदेशी व्यक्तींविषयीचे कायदे (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ११).

४. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५०' (१९५० चा ३५).

५. 'विदेशी व्यक्तींविषयीचा कायदा (प्रयुक्ती व विशोधन) अधिनियम, १९६२' (१९६२ चा ४२).

६. 'विधि अनुकूलन आदेश, १९४८'.

७. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

# विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. आदेश काढण्याची शक्ती.

३क. राष्ट्रकुलांतर्गत देशांतील नागरिकांना व इतर व्यक्तींना विवक्षित प्रकरणीं हा अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.

४. नजरकैंदी.

५. नावात बदल करणे.

६. नौकाधिपती, इ. वरील आबंधने.

७. हॉटेलचालक आणि इतर यांच्यावर तपशील पुरवण्याचे आबंधन.

७क. विदेशी व्यक्तींची वर्दळ असणाऱ्या जागांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती.

८. राष्ट्रीयत्व ठरवणे.

९. शाबितीची जबाबदारी.

१०. अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.

११. आदेश, निदेश, इत्यादींची अंमलबजावणी करण्याची शक्ती.

१२. प्राधिकार प्रत्यायोजित करण्याची शक्ती.

१३. या अधिनियमाचे उपबंध इ. चे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करणे, इ.

१४. दंड.

१५. या अधिनियमाखाली कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

१६. इतर कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.

१७. निरसन.

# विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६

(१९४६ चा अधिनियम क्रमांक ३१)

[ २३ नोव्हेंबर, १९४६ ]

विदेशी व्यक्तींबाबत केंद्र शासनाला विवक्षित शक्ती प्रदान करण्यासाठी अधिनियम.

ज्या अर्थी, भारतात विदेशी व्यक्तींचा प्रवेश, तेथे त्यांची उपस्थिती व त्यांचे तेथून प्रयाण यासंबंधीच्या शक्तींचा केंद्र शासनाने वापर करण्यासाठी काही उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :---

**१.** (१) या अधिनियमास 'विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण [१]* * * [२][भारतभर] आहे.

२. या अधिनियमात,--- व्याख्या.

[३][ (क) "विदेशी व्यक्ती" याचा अर्थ, भारताचा नागरिक नसलेली व्यक्ती असा होतो ; ]

[४]* * * *

(ख) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली काढलेल्या आदेशांद्वारे विहित केलेले असा होतो ;

(ग) "विनिर्दिष्ट" याचा अर्थ, विहित प्राधिकरणाच्या निदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेले असा होतो.

**३.** (१) केंद्र शासन [५]आदेश काढून त्याद्वारे, सर्वसाधारणपणे किंवा सर्व विदेशी व्यक्तींच्या बाबतीत किंवा एखाद्या विशिष्ट विदेशी व्यक्तीबाबत किंवा एखाद्या विहित वर्गाच्या वा वर्णनाच्या विदेशी व्यक्तीबाबत, विदेशी व्यक्तींनी भारतात प्रवेश करणे किंवा तेथून प्रयाण करणे किंवा त्यांनी तेथे उपस्थित असणे किंवा त्यांची तेथील उपस्थिती चालू राहाणे या गोष्टींना मनाई करणारा, त्यांचे नियमन करणारा वा त्यांवर निर्बन्ध घालणारा उपबंध करू शकेल. आदेश काढण्याची शक्ती.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, या कलमाखाली दिलेल्या आदेशांमध्ये असा उपबंध करता येईल की,---

(क) विदेशी व्यक्तीस [२][भारतात] प्रवेश करता येणार नाही, किंवा विहित करण्यात येईल अशा वेळीच व अशा मार्गानेच, तसेच विहित अशाच बंदरात किंवा ठिकाणी आणि आगमनाच्या वेळी विहित अशा शर्तींचे पालन करूनच भारतात प्रवेश करावा लागेल ;

(ख) विदेशी व्यक्तीस भारतातून प्रयाण करता येणार नाही, किंवा विहित करण्यात येईल अशा वेळीच व अशाच मार्गाने, तसेच विहित अशा बंदरातून किंवा ठिकाणाहून आणि प्रयाणाच्याच वेळी विहित अशा शर्तींचे पालन करूनच भारतातून प्रयाण करावे लागेल ;

(ग) विदेशी व्यक्तीस भारतात किंवा तेथील एखाद्या विहित भागात थांबून राहता येणार नाही ;

[६][ (गग) विदेशी व्यक्तीस या कलमाखालील आदेशाद्वारे भारतात तिने थांबून राहू नये असे फर्मावण्यात आले असेल तर, त्या विदेशी व्यक्तीस भारतातून होणाऱ्या तिच्या निष्कासनाचा व असे निष्कासन होईतोवर तिच्या निर्वाहाचा खर्च तिला जमेल त्या मार्गाने भागवावा लागेल ; ]

(घ) विदेशी व्यक्तीस [२][भारतातील] जे क्षेत्र विहित करण्यात येईल अशा क्षेत्रात स्थानांतरण करून तेथेच राहावे लागेल ;

(ङ) विदेशी व्यक्तीस विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींचे पालन करावे लागेल, त्या अशा:---

(एक) विशिष्ट ठिकाणी वास्तव्य करावयास लावणारी शर्त ;

(दोन) तिच्या हालचालींवर कोणतेही निर्बन्ध लादणारी शर्त ;

---

१. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे घालण्यात आलेले "हैद्राबाद राज्य खेरीजकरून" हे शब्द १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे गाळले.

२. १९४७ चा अधिनियम ३८-कलम २ द्वारे 'ब्रिटिश भारत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९५७ चा अधिनियम ११-कलम २ द्वारे मूळच्या खंडाऐवजी घातले (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

४. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे घालण्यात आलेला खंड (कक) १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे गाळला.

५. 'विदेशी व्यक्ती आदेश, १९४८' करिता पहा---भारताचे राजपत्र, १९४८, भाग एक, पृ. १९८

६. १९४७ चा अधिनियम ३८-कलम ४ द्वारे घातले.

(तीन) विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे तिने आपली ओळख पटवणारा तसा पुरावा सादर करणे आणि विहित किंवा विनिर्दिष्ट असा तपशील तशा प्राधिकरणाला तशा पद्धतीने आणि तशा वेळी व ठिकाणी कळवणे या गोष्टी आवश्यक करणारी शर्त ;

(चार) तिने आपले छायाचित्र व बोटांचे ठसे घेऊ देणे आणि आपल्या हस्ताक्षराचे व स्वाक्षरीचे नमुने विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी व ठिकाणी सादर करणे या गोष्टी आवश्यक करणारी शर्त ;

(पाच) विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडून आणि अशा वेळी व ठिकाणी तिला स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घ्यावयास लावणारी शर्त ;

(सहा) विहित किंवा विनिर्दिष्ट वर्णनाच्या व्यक्तींशी संबंध ठेवण्यास तिला मनाई करणारी शर्त ;

(सात) विहित किंवा विनिर्दिष्ट वर्णनाच्या कृती करण्यास तिला मनाई करणारी शर्त ;

(आठ) विहित किंवा विनिर्दिष्ट वस्तू वापरण्यास किंवा जवळ बाळगण्यास तिला मनाई करणारी शर्त ;

(नऊ) विहित किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अश कोणत्याही बाबतीत तिच्या वर्तणुकीचे अन्यथा नियमन करणारी शर्त ;

(च्) विदेशी व्यक्तीस, विहित किंवा विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही किंवा सर्व निर्बन्धांचे किंवा शर्तींचे योग्य रीतीने पालन होण्यासाठी, किंवा त्यांच्या अंमलबजावणीला पर्याय म्हणन, जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र करून द्यावे लागेल ;

[१][ (छ्) विदेशी व्यक्तीला अटक करण्यात यावी आणि तिला स्थानबद्ध किंवा बंदिवान करण्यात यावे ;]

आणि, [२][विहित करावयाच्या किंवा करता येईल अशा कोणत्याही गोष्टीसाठी आणि] केंद्र शासनाच्या मते, या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने समयोचित किंवा आवश्यक असलेल्या कोणत्याही आनुषंगिक व पूरक बाबींसाठी त्या आदेशाद्वारे उपबंध करता येईल.

(३) यासंबंधात विहित केलेले कोणतेही प्राधिकरण, कोणत्याही विशिष्ट विदेशी व्यक्तीच्या बाबतीत, पोटकलम (२) चा खंड (ङ) [३][किंवा खंड (च्)] याअन्वये आदेश काढू शकेल.

[४][राष्ट्रकुलांतर्गत देशांतील नागरिकांना व इतर व्यक्तींना विवक्षित प्रकरणीं हा अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.]

[४][३क. (१) केंद्र शासन आदेश काढून त्याद्वारे असे जाहीर करू शकेल की, या अधिनियमाचे किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाचे सर्व किंवा काही उपबंध पुढील व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या बाबतीत लागू होणार नाहीत किंवा प्रस्तुत आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशाच परिस्थितीत किंवा असेच अपवाद किंवा बदल करून किंवा अशाच शर्तींच्या अधीनतेने लागू होतील:—

(क्) याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही राष्ट्रकुलांतर्गत देशाचे नागरिक ; किंवा

(ख्) इतर कोणतीही विशिष्ट विदेशी व्यक्ती किंवा विशिष्ट वर्गाची अथवा वर्णनाची विदेशी व्यक्ती.

(२) या कलमाखाली काढलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत, तो आदेश काढल्यानंतर शक्य होईल तेवढ्या लवकर संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.]

नजरकैदी

४. [५][(१) ज्या कोणत्याही विदेशी व्यक्तीबाबत, तिला स्थानबद्ध किंवा बंदिवान करण्यात यावे असे सांगणारा कलम ३-पोटकलम (२)-खंड (छ्) खालील आदेश अंमलात असेल तिला (यात यापुढे "नजरकैदी" म्हणून निर्दिष्ट) केंद्र शासन वेळोवेळी आदेशाद्वारे ठरवून देईल अशा ठिकाणी व अशा पद्धतीने आणि निर्वाह, शिस्तपालन व गुन्ह्यांना शिक्षा आणि शिस्तभंग यांसंबंधी ते ठरवून देईल अशा शर्तींच्या अधीनतेने स्थानबद्ध किंवा बंदिवान करण्यात येईल.]

(२) ज्या कोणत्याही विदेशी व्यक्तीच्या बाबतीत, काही विदेशी व्यक्तींच्या देखरेखीखाली निवासासाठी अलग राखून ठेवलेल्या एखाद्या ठिकाणी तिने राहावे असे फर्मावणारा कलम ३-पोटकलम (२)-खंड (ङ) खालील आदेश अंमलात असेल ती व्यक्ती (यात यापुढे "पारोलबद्ध व्यक्ती"

---

१. १९५७ चा अधिनियम ११-कलम ३ द्वारे (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून) गाळलेला हा मजकूर १९६२ चा अधिनियम ४२-कलम ३ द्वारे पुन्हा घातला.

२. १९४७ चा अधिनियम ३८-कलम ४ द्वारे घातले.

३. १९५७ चा अधिनियम ११-कलम ३ द्वारे "खंड (च्) किंवा खंड (छ्)" याऐवजी घातले (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ४ द्वारे घातले (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

५. १९६२ चा अधिनियम ४२ द्वारे घातले. १९५७ चा अधिनियम ११-कलम ५ द्वारे पूर्वीचे पोटकलम (१) गाळले होते. (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

म्हणून निर्दिष्ट), त्या ठिकाणी राहात असताना, निर्वाह, शिस्तपालन व गुन्ह्यांना शिक्षा आणि शिस्तभंग यांबाबतच्या ज्या शर्ती केंद्र शासन वेळोवेळी आदेशाद्वारे ठरवून देईल त्या शर्तींना अधीन राहील.

[१][(३) कोणत्याही व्यक्तीस पुढील गोष्टी करता येणार नाहीत :—

(क) नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्तीस हवालतीतून किंवा तिच्या निवासासाठी अलग राखून ठेवलेल्या जागेतून निसटून जाण्यास जाणूनबुजून साहाय्य करणे किंवा अशा प्रकारे निसटून गेलेल्या नजरकैदीस किंवा पारोलबद्ध व्यक्तीस जाणूनबुजून आसरा देणे, किंवा

(ख) नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्ती निसटून गेली असता, ती व्यक्ती पकडली जाऊ नये, त्याकामी व्यत्यय यावा किंवा हस्तक्षेप व्हावा अशा हेतूने त्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे साहाय्य करणे.

(४) भारतातील ज्या ठिकाणी नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्तींना स्थानबद्धतेत किंवा, प्रकरणपरत्वे, निर्बंधात ठेवण्यात आलेले असेल त्या ठिकाणी जाण्याबाबत आणि त्या ठिकाणी करावयाच्या वर्तणुकीबाबत नियमन करण्याकरिता, आणि विहित करण्यात येतील अशा वस्तू अशा ठिकाणाबाहेरून नजरकैदी किंवा पारोलबद्ध व्यक्तींकडे पाठवण्यास किंवा त्यांच्यासाठी नेण्यास मनाई करण्याकरिता किंवा त्याबाबत नियमन करण्याकरिता केंद्र शासन आदेशाद्वारे उपबंध करू शकेल.]

**नावात बदल करणे.**

५. (१) हा अधिनियम अंमलात आला त्या तारखेस जी विदेशी व्यक्ती भारतात होती अशा कोणत्याही व्यक्तीला, त्या तारखेनंतर [२][भारतात] असताना, उक्त तारखेच्या निकटपूर्व काळात ती साधारणतः ज्या नावाने ओळखली जात असेल त्या नावाव्यतिरिक्त इतर कोणतेही नाव कोणत्याही प्रयोजनासाठी धारण करता किंवा वापरता येणार नाही अथवा त्या प्रयोजनासाठी धारण करण्याचा किंवा वापरण्याचा उद्देश बाळगता येणार नाही.

(२) हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेनंतर एखाद्या विदेशी व्यक्तीने जर एखादा व्यापार किंवा धंदा, उक्त तारखेच्या निकटपूर्वी तो व्यापार किंवा धंदा ज्या नावाने किंवा अभिधानाने चालवला जात होता त्यापेक्षा वेगळ्या अशा कोणत्याही नावाने स्वतंत्रपणे किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीशी सहयोग करून चालू ठेवला किंवा चालू ठेवण्याचे योजिले तर, पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ ती व्यक्ती उक्त तारखेच्या निकटपूर्वी ज्या नावाने ती ओळखली जात होती त्यापेक्षा वेगळे नाव वापरीत आहे असे मानण्यात येईल.

(३) हा अधिनियम अंमलात आला त्या तारखेस [२][भारतात] नसलेली एखादी विदेशी व्यक्ती त्यानंतर [२][भारतात] आली तर तिच्या बाबतीत, पोटकलम (१) व (२) मध्ये हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेसंबंधीचा जो कोणताही उल्लेख असेल त्याऐवजी जणू काही ती विदेशी व्यक्ती त्यानंतर भारतात प्रथम ज्या तारखेस आली त्या तारखेचाच उल्लेख केलेला असावा त्याप्रमाणे ती पोटकलमे परिणामक होतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ —

(क) "नाव" या शब्दप्रयोगात आडनावाचाही समावेश होतो; आणि

(ख) नावातील वर्णक्रम बदलल्यास नाव बदलण्यात आले असे मानण्यात येईल.

(५) (क) केंद्र शासनाने दिलेल्या [३]* * * लायसनास किंवा परवानगीस अनुसरून एखादे नाव; किंवा

(ख) विवाहित महिलेने तिच्या पतीचे नाव

धारण केल्याच्या किंवा वापरल्याच्या बाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**नौकाधिपती, इत्यादींवरील आबंधने.**

६. (१) भारतातील बंदराला लागणाऱ्या किंवा तेथून प्रवासाला निघणाऱ्या ज्या जलयानातील उतारू समुद्रमार्गे त्या बंदरात येणारे किंवा तेथून जाणारे असतील त्याच्या अधिपतीला आणि भारतातील कोणत्याही ठिकाणी उतरणाऱ्या किंवा तेथून निघणाऱ्या ज्या वायुयानातील उतारू हवाईमार्गे त्या ठिकाणी येणारे किंवा तेथून जाणारे असतील त्याच्या पायलटाला जे विदेशीय असतील असे कोणतेही उतारू किंवा यानिकगणाचे सदस्य यांच्याबाबत विहित तपशील पुरवणारे एक प्रतिवेदन विहित करण्यात येईल अशा व्यक्तीकडे आणि तशा पद्धतीने सादर करावे लागेल.

(२) कोणताही जिल्हा दंडाधिकारी आणि कोणताही पोलीस आयुक्त किंवा जेथे पोलीस आयुक्त नसेल तेथे कोणताही पोलीस अधीक्षक हा, या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या अंमलबजावणीच्या संबंधातील कोणत्याही प्रयोजनार्थ, विहित करण्यात येईल अशा कोणत्याही जलयानाच्या अधिपतीला किंवा अशा कोणत्याही वायुयानाच्या पायलटाला त्या जलयानातील किंवा वायुयानातील, प्रकरणपरत्वे, उतारू किंवा यानिकगणाचे सदस्य यांच्यासंबंधी विहित करण्यात येईल अशी माहिती सादर करण्यास फर्मावू शकेल.

---

१. १९६२ चा अधिनियम ४२-कलम ३ द्वारे पोटकलम (३) व (४) यांऐवजी घातले.

२. १९४७ चा अधिनियम ३८-कलम २ द्वारे "ब्रिटिश भारत" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९५७ चा अधिनियम ११-कलम ६ द्वारे 'राज' हा शब्दोल्लेख गाळला (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

(३) अशा जलयानातील किंवा वायुयानातील कोणत्याही उतारूकडून आणि अशा जलयानातील किंवा वायुयानातील यानिकगणाच्या कोणत्याही सदस्याकडून, प्रकरणपरत्वे, जलयानाचा अधिपती किंवा वायुयानाचा पायलट पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले प्रतिवेदन सादर करण्यासाठी किंवा पोटकलम (२) अन्वये आवश्यक असेल अशी माहिती सादर करण्यासाठी मागवील अशी कोणतीही माहिती त्या उतारूला किंवा सदस्याला त्याच्याकडे सादर करावी लागेल.

[1][(४) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून एखाद्या विदेशी व्यक्तीने भारतात प्रवेश केला तर, तिने असा प्रवेश केल्यापासून दोन महिन्यांच्या आत विहित प्राधिकरण, ज्याच्याद्वारे असा प्रवेश करण्यात आला त्या जलयानाच्या अधिपतीला किंवा वायुयानाच्या पायलटाला अथवा अशा जलयानाच्या किंवा वायुयानाच्या मालकाला किंवा त्या मालकाच्या अभिकर्त्याला, प्राधिकरणाचे समाधान होईल अशाप्रकारे व सरकारच्या खर्चाने नव्हे तर अन्यथा उक्त विदेशी व्यक्तीला भारतातून निष्कासित करण्यासाठी जलयानात किंवा वायुयानात तिला जागा देण्याची व्यवस्था करण्यास फर्मावू शकेल.

(५) भारतातील एखाद्या बंदरातून किंवा ठिकाणाहून भारताबाहेरील इतर कोणत्याही ठिकाणी जे उतारूंना घेऊन जाणार आहे अशा कोणत्याही जलयानाचा अधिपती किंवा वायुयानाचा पायलट अथवा अशा जलयानाचा किंवा वायुयानाचा मालक किंवा त्या मालकाचा अभिकर्ता, त्याला जर केंद्र शासनाने तसा निदेश दिला आणि चालू दराने भाड्याची रक्कम भरण्यात आली तर, कलम ३ अन्वये भारतात न राहण्याचा आदेश दिलेल्या विदेशी व्यक्तीला व तिच्यावर अवलंबून असलेल्या कोणी व्यक्ती तिच्यासोबत प्रवास करीत असल्यास त्यांना केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा ज्या बंदरात किंवा ठिकाणी ते जलयान किंवा वायुयान थांबणार असेल अशा भारताबाहेरील बंदरापर्यंत किंवा ठिकाणापर्यंत जाण्यासाठी आपल्या जलयानात किंवा वायुयानात जागा उपलब्ध करून देईल.]

[1][(६)] या कलमाच्या प्रयोजनांसाठी—

(क) "एखाद्या जलयानाचा अधिपती" आणि "कोणत्याही वायुयानाचा पायलट" या संज्ञांमध्ये या कलमान्वये आपणांकडे सोपवण्यात आलेली आपली कर्तव्ये आपल्या वतीने पार पाडण्यासाठी अशा अधिपतीने किंवा, प्रकरणपरत्वे, पायलटाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो;

(ख) "उतारू" याचा अर्थ, यानिकगणाचा खराखुरा सदस्य नसलेली आणि जलयानातून किंवा वायुयानातून प्रवास करणारी किंवा प्रवास करू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती असा होतो.

**हॉटेलचालक आणि इतर यांच्यावर तपशील पुरवण्याचे आबंधन.**

७.(१) ज्या ठिकाणी राहण्याची किंवा झोपण्याची सोय बक्षिसी घेऊन केली जाते अशी वास्तू सुसज्ज असली वा नसली तरी तेथील चालकाने, अशा वास्तूमध्ये ज्या विदेशी व्यक्तींची सोय करण्यात आलेली असेल त्यांच्याबद्दलची विहित करण्यात येईल अशी माहिती अशा विहित व्यक्तीस आणि विहित पद्धतीने कळवणे हे त्या चालकाचे कर्तव्य असेल.

**स्पष्टीकरण**.—या पोटकलमात उल्लेखिलेली माहिती ही अशा वास्तूत ज्यांची सोय करण्यात आली आहे त्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही विदेशी व्यक्तीशी संबंधित असू शकेल आणि ती ठराविक कालांतरागणिक किंवा विशिष्ट वेळी वा प्रसंगी सादर करण्यात यावी असे सांगता येईल.

(२) अशा प्रकारच्या कोणत्याही वास्तूत सोय करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेली माहिती सादर करण्यासाठी त्या वास्तूचा चालक मागवील असा तपशील त्या चालकाकडे सादर करावा लागेल.

(३) अशा प्रत्येक वास्तूच्या चालकाला, त्याने स्वत: पोटकलम (१) अन्वये सादर केलेल्या माहितीची आणि पोटकलम (२) अन्वये त्याने मिळवलेल्या माहितीची दप्तरी नोंद ठेवावी लागेल आणि ते दप्तर विहित करण्यात येईल अशा पद्धतीनुसार राखावे लागेल व विहित अशा कालावधीपर्यंत जतन करावे लागेल, आणि कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला ते दप्तर निरीक्षणार्थ खुले राहील.

[2][(४) यासंबंधात विहित केलेल्या एखाद्या क्षेत्रात, विहित प्राधिकरणाने संबंधित व्यक्तींना कळवण्यासाठी त्याच्या मते सुयोग्य अशा पद्धतीने एखादी नोटीस प्रसिद्ध करून जर तसा निदेश दिला तर, कोणत्याही निवासी वास्तूची वहिवाट करणाऱ्या किंवा तिच्यावर ताबा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने अशा वास्तूत सोय करण्यात येणाऱ्या विदेशी व्यक्तींच्या संबंधात, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती विनिर्दिष्ट अशा व्यक्तीस व विनिर्दिष्ट अशा पद्धतीने सादर करणे हे तिचे कर्तव्य असेल; आणि अशा वास्तूत सोय करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस पोटकलम (२) चे उपबंध लागू होतील.]

**[3][विदेशी व्यक्तींची वर्दळ असणाऱ्या जागांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती.]**

[3][७क. (१) जी वास्तू उपाहारगृह म्हणून किंवा सार्वजनिक रावत्याचे किंवा करमणुकीचे स्थान म्हणून किंवा क्लब म्हणून वापरण्यात येते व जेथे विदेशी व्यक्तींचा राबता असतो अशा कोणत्याही वास्तूच्या मालकास अथवा त्या वास्तूवर ताबा असणाऱ्या व्यक्तीस पुढील गोष्टी करण्याबाबत विहित प्राधिकरण, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, निदेश देऊ शकेल :—

(क) अशी वास्तू संपूर्णपणे किंवा विशिष्ट कालावधीपुरती बंद ठेवणे, किंवा

---

१. १९४७ चा अधिनियम ३८-कलम ५ द्वारे पोटकलमे (४) आणि (५) घातली आणि मूळचे पोटकलम (४) यास '(६)' हा नवीन क्रमांक घातला.

२. कित्ता—कलम ६ द्वारे घातले.

३. कित्ता—कलम ७ द्वारे घातले.

(ख्) विनिर्दिष्ट करण्यात येईल अशाच परिस्थितीत अशा वास्तूचा वापर करणे किंवा वापर करू देणे, किंवा

(ग) अशा वास्तूमध्ये सर्व विदेशी व्यक्तींना किंवा एखाद्या विशिष्ट विदेशी व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला प्रवेश नाकारणे.

(२) ज्या व्यक्तीला पोटकलम (१) अन्वये कोणताही निदेश देण्यात आलेला असेल ती व्यक्ती, तो निदेश अंमलात असेपर्यंत विहित प्राधिकरणाच्या लेखी पूर्वपरवानगीखेरीज व ज्या अटी घालणे प्राधिकरणास योग्य वाटेल अशा अटींचे अनुसरण केल्याखेरीज, उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी इतर कोणत्याही वास्तूचा वापर करणार नाही किंवा करू देणार नाही.

(३) पोटकलम (१) अन्वये कोणताही निदेश देण्यात आलेला असून त्यामुळे जी व्यक्ती नाराज झाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, असा निदेश दिल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत केंद्र शासनाकडे अपील करता येईल; आणि या बाबतीत केंद्र शासनाचा निर्णय अंतिम राहील.]

**राष्ट्रीयत्व ठरवणे.**

८. (१) जेव्हा एखादी विदेशी व्यक्ती ही एकापेक्षा अधिक विदेशी राष्ट्रांच्या कायद्यानुसार राष्ट्रिक म्हणून ओळखली जात असेल किंवा एखाद्या विदेशी व्यक्तीला एखादे राष्ट्रीयत्व द्यावयाचेच तर ते कोणते द्यावे हे काही कारणास्तव ठरविता येत नसेल तेव्हा, हितसंबंध किंवा सहानुबंध या दृष्टीने ती विदेशी व्यक्ती त्या त्या काळी ज्या देशाशी सर्वाधिक निकटसंबंधित आहे असे विहित प्राधिकरणास वाटेल त्या देशाची अथवा तिचे राष्ट्रीयत्व अनिश्चित असेल तर, तिचे त्याप्रमाणे लगतपूर्वी ज्या देशाशी संबंध होते त्या देशाची ती राष्ट्रिक असल्याचे मानता येईल :

परंतु, जेव्हा एखाद्या विदेशी व्यक्तीस जन्माने एखादे राष्ट्रीयत्व प्राप्त झालेले असेल तेव्हा, केंद्र शासनाने सरसकट किंवा एखाद्या विशिष्ट प्रकरणी तसे निदेशित केल्यास तेवढे खेरीजकरून एरव्ही, त्या व्यक्तीचे मूळचे राष्ट्रीयत्व कायम आहे असे मानण्यात येईल—मात्र त्या विदेशी व्यक्तीने त्यानंतर नागरिकीकरणाद्वारे किंवा अन्यथा दुसरे एखादे राष्ट्रीयत्व प्राप्त करून घेतलेले आहे व अशा रीतीने तिने ज्या देशाचे राष्ट्रीयत्व प्राप्त करून घेतलेले आहे त्या देशाच्या शासनाकडून संरक्षण मिळण्यास पात्र म्हणून ती अजूनही ओळखली जात आहे असे त्या व्यक्तीने उक्त प्राधिकरणाचे समाधान होईल अशा प्रकारे शाबीत केले तर गोष्ट अलाहिदा.

(२) राष्ट्रीयत्वासंबंधी पोटकलम (१) अन्वये दिलेला निर्णय अंतिम राहील आणि त्याला कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही :

परंतु, केंद्र शासन स्वतः होऊन किंवा संबंधित विदेशी व्यक्तीने अर्ज केल्यावरून, असा निर्णय बदलू शकेल.¶

**शाबितीची जबाबदारी.**

९. कलम ८ च्या कक्षेत न येणाऱ्या एखाद्या प्रकरणामध्ये या अधिनियमाच्या संदर्भात किंवा या अधिनियमान्वये दिलेल्या एखाद्या आदेशाच्या वा निदेशाच्या संदर्भात जर अमुक एखादी व्यक्ती ही विदेशी व्यक्ती आहे की नाही अथवा ती व्यक्ती विशिष्ट वर्गाची वा वर्णनाची विदेशी व्यक्ती आहे की नाही असा प्रश्न उपस्थित झाला तर, त्या परिस्थितीत ती व्यक्ती विदेशी व्यक्ती नाही अथवा, प्रकरणपरत्वे, विशिष्ट वर्गाची किंवा वर्णनाची विदेशी व्यक्ती नाही हे शाबीत करण्याची जबाबदारी 'भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ (१८७२'चा १) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा व्यक्तीवरच राहील.

१०. [अधिनियम लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.] 'विदेशी व्यक्तींविषयीचे कायदे (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ११) कलम ७ द्वारे निरसित (१९ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

**आदेश, निदेश इत्यादींची अंमलबजावणी करण्याची शक्ती.**

११. (१) या अधिनियमाच्या उपबंधांद्वारे किंवा त्यांखाली किंवा त्यांनुसार कोणताही निदेश देण्याची किंवा इतर कोणतीही शक्ती वापरण्याची शक्ती ज्याला प्रदान करण्यात आलेली आहे असे कोणतेही प्राधिकरण, या अधिनियमात स्पष्टपणे उपबंधित केल्याप्रमाणे करावयाच्या अन्य कोणत्याही कारवाईव्यतिरिक्त, अशा निदेशाचे अनुपालन व्हावे किंवा त्या निदेशाचा भंग होऊ नये वा झाल्यास त्याचे परिमार्जन व्हावे किंवा, प्रकरणपरत्वे, त्या शक्तीचा वापर प्रभावीरीत्या व्हावा यासाठी, त्याच्या मते वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक असतील असे उपाय योजू शकेल किंवा योजण्याची व्यवस्था करू शकेल आणि आवश्यक तेवढ्या बळाचा वापर करू शकेल किंवा वापर करण्याची व्यवस्था करू शकेल.

(२) कोणताही पोलीस अधिकारी हा, या अधिनियमाखाली किंवा त्यानुसार काढलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा निदेशाचे अनुपालन व्हावे किंवा त्या आदेशाचा किंवा निदेशाचा भंग होऊ नये किंवा झाल्यास त्याचे परिमार्जन व्हावे यासाठी, त्याच्या मते वाजवी मर्यादेपर्यंत आवश्यक असतील असे उपाय योजू शकेल आणि आवश्यक तेवढ्या बळाचा वापर करू शकेल.

(३) या कलमाद्वारे प्रदान केलेल्या शक्तीमुळे, त्या शक्तीचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही जमिनीवर वा इतर मालमत्तेच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकारही प्रदान होतो असे मानण्यात येईल.

(शा.म.मु) एच ४३११—२(५०५-११-८०)

प्राधिकार प्रत्यायोजित करण्याची शक्ती.

१२. एखादा निदेश, संमती किंवा परवानगी देण्याची किंवा इतर कोणतीही कृती करण्याची शक्ती या अधिनियमान्वये किंवा त्या अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशान्वये ज्या प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेली असेल ते प्राधिकरण, विरुद्ध असा स्पष्ट उपबंध केलेला नसेल तर, आपल्या हाताखालील कोणत्याही दुय्यम प्राधिकरणास आपल्या वतीने अशा शक्तीचा वापर करण्यासाठी, सशर्त वा बिनशर्त, लेखी प्राधिकृत करू शकेल, आणि त्यानंतर त्या प्राधिकारपत्रात ज्या काही शर्ती असतील त्यांच्या अधीनतेने, ते दुय्यम प्राधिकरण हे या अधिनियमान्वये किंवा त्याखाली ज्यास अशी शक्ती प्रदान केलेली आहे ते प्राधिकरण असल्याचे मानले जाईल.

या अधिनियमाचे उपबंध, इत्यादींचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करणे, इ.

१३. (१) जी व्यक्ती या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा त्याखाली दिलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल किंवा अपप्रेरणा देण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघन करण्याची पूर्वतयारी म्हणून एखादी कृती करील, किंवा अशा कोणत्याही आदेशानुसार दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात कसूर करील तिने या अधिनियमाच्या उपबंधांचे उल्लंघन केले आहे असे मानण्यात येईल.

(२) जी कोणीही व्यक्ती, अन्य कोणाही व्यक्तीने या अधिनियमाच्या उपबंधांचे अथवा त्यांखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा देण्यात आलेल्या निदेशाचे उल्लंघन केले आहे हे माहीत असताना अथवा असे समजण्यास वाजवी कारण असताना उक्त उल्लंघन केल्याबद्दल त्या अन्य व्यक्तीच्या अटकेला, संपरीक्षेला अथवा शिक्षेला प्रतिबंध करण्याच्या, त्यामध्ये व्यत्यय आणण्याच्या अथवा अन्यथा त्यात हस्तक्षेप करण्याच्या हेतूने कोणतेही साहाय्य करील तिने त्या उल्लंघनाला अपप्रेरणा दिली आहे असे मानण्यात येईल.

(३) कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा त्याच्या अनुसार देण्यात आलेल्या निदेशाचे उल्लंघन करून कोणतीही विदेशी व्यक्ती ज्याच्या साहाय्याने [१][भारतात] प्रवेश करील अथवा भारत सोडून जाईल त्या जलयानाचा अधिपती अथवा त्या वायुयानाचा पायलट याने उक्त उल्लंघन होऊ नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केले नाही तर, त्याने या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे असे मानण्यात येईल.

दंड.

१४. जर कोणाही व्यक्तीने या अधिनियमाच्या उपबंधांचे अथवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा या अधिनियमाला किंवा अशा आदेशाला अनुसरून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे उल्लंघन केले तर, अशा व्यक्तीला पाच वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीचा कारावास होईल आणि तसेच ती द्रव्यदंडासही पात्र होईल, आणि अशा व्यक्तीने कलम ३ च्या पोटकलम (२) चा खंड (च्) यानुसार बंधपत्र करून दिले असेल तर, तिचे बंधपत्र दंडपात्र होईल, आणि अशा बंधपत्राने बद्ध झालेल्या व्यक्तीला दंड भरावा लागेल, अथवा हा दंड तिला का भरावा लागू नये याबाबत, दोषसिद्धी करणाऱ्या न्यायालयाचे समाधान होईल अशा प्रकारचे कारण दाखवावे लागेल.

या अधिनियमाखाली कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

१५. या अधिनियमाखाली सद्‌भावपूर्वक करण्यात आली असेल किंवा करण्याचे योजलेले असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

इतर कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.

१६. या अधिनियमातील उपबंध हे 'विदेशी व्यक्ती नोंदणी अधिनियम, १९३९' (१९३९ चा १६), 'भारतीय पारपत्र अधिनियम, १९२०' (१९२० चा ३४) आणि त्या त्या काळी अंमलात असलेली इतर कोणतीही अधिनियमिती यांतील उपबंधांच्या व्यतिरिक्त असतील, त्यास न्यूनकारी असणार नाहीत.

१७. [निरसने.] 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५०' (१९५० चा ३५)-कलम २ व अनुसूची १ ली याद्वारे निरसित.

---

१. १९४७चा अधिनियम ३८-कलम २ द्वारे 'ब्रिटिश भारत' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

# विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६

## *THE FOREIGNERS ACT, 1946*

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| aircraft | वायुयान | [S.6(1)] |
| detain or confine | स्थानबद्ध किंवा बंदिवान करणे | [S.3 (2)(*g*)] |
| embark | प्रवासाला निघणे | [S.6(1)] |
| escape | पळून जाणे | [S.4(3)] |
| foreigner | विदेशी व्यक्ती | [S.2(*a*)] |
| hotel keeper | हॉटेलचालक | [S.7-m.n.] |
| internee | नजरकैदी | [S.4(1)] |
| master of vessel | नौकाधिपति | [S.6-m.n.] |
| name or style | नाव किंवा अभिधान | [S.5(2)] |
| passenger | उतारू | [S.6(6)] |
| person on parole | पारोलबद्ध व्यक्ती | [S.4(2)] |
| pilot | पायलट | [S.6(1)] |
| place of public resort | सार्वजनिक राबत्याची जागा | [S.7A(1)] |
| prescribed authority | विहित प्राधिकरण | [S. 2(*c*)] |
| rectify a breach | भंगाचे परिमार्जन करणे | [S.11(1)] |
| restrict | निर्बंधात ठवणे | [S.4(4)] |
| sympathy | सहानुबंध | [S.8(1)-proviso] |
| vessel | जलयान | [S.6(1)] |
| with or without sureties | जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना | [S.3(2)(*f*)] |

# विदेशी व्यक्ती अधिनियम, १९४६

## *THE FOREIGNERS ACT, 1946*

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| उतारू | passenger | [S.6(6)] |
| जलयान | vessel | [S.6(1)] |
| जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना | with or without sureties | [S.3(2)(*f*)] |
| नजरकैदी | internee | [S.4(1)] |
| नाव किंवा अभिधान | name or style | [S.5(2)] |
| निर्बन्धात ठेवणे | restrict | [S.4(4)] |
| नौकाधिपति | master of vessel | [S.6-m.n.] |
| पळून जाणे | escape | [S.4(3)] |
| पायलट | pilot | [S.6(1)] |
| पारोलबद्ध व्यक्ती | person on parole | [S.4(2)] |
| प्रवासाला निघणे | embark | [S.6(1)] |
| भंगाचे परिमार्जन करणे | rectify a breach | [S.11(1)] |
| वायुयान | aircraft | [S.6(1)] |
| विदेशी व्यक्ती | foreigner | [S.2(*a*)] |
| विहित प्राधिकरण | prescribed authority | [S.2(*c*)] |
| सहानुबंध | sympathy | [S.8(1)-proviso] |
| सार्वजनिक राबत्याची जागा | place of public resort | [S.7A(1)] |
| स्थानबद्ध किंवा बंदिवान करणे | detain or confine | [S.3(2)(*g*)] |
| हॉटेलचालक | hotel keeper | [S.7-m.n.] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई